वर्ष तेरावे : अंक २४ : डिसेंबर २०२५



# कॉक्लिआ वार्ता

मुकं करोति वाचालं...

COCHLEA - PUNE
कॉक्लिआ पुणे
श्रवण आणि भाषा विकासासाठी
FOR HEARING & SPEECH

◆ 1998 ◆

# COCHLEA WARTA





Volume Thirteen : Issue 24 : DECEMBER 2025 Total Pages : 16 Rs. 10/-




कॉक्लिआ आणि स्वरनाद येथील

**सर्व पदाधिकारी, शिक्षकवृंद आणि कर्मचारी**

COCHLEA WARTA कॉक्लिआ वार्ता

वर्ष : १३ वे | अंक : २४

## अंतरंग

**Editorial** ... ०२
- Mrs. Manasee Date

**यशा मागून येणारे आत्मचिंतन नेहमीच गरजेचे** ... ०३
– डॉ. अविनाश वाचासुंदर

**वार्षिक स्नेहसंमेलन** ... ०५
– नेहा नाटेकर

**आमची पहिली CRE** ... ०७
– शांती रोकडे

**अफाट वाचन, समृद्ध भाषेचे जनक** ... १०
– हेमा नातू

**कर्णबधिर मूलं घडविताना आलेली आव्हाने आणि केलेली मात** ... १३
– सौ.मंगल बोंबले

**स्थलांतरीत पाखरं** ... १६
– ज्योती दरणे

**संपादक**
डॉ. अविनाश वाचासुंदर

**कार्यकारी संपादक**
सौ. मानसी दाते

**कार्यकारी मंडळ**
मृदुल हेमंत बापट
तृप्ती कोहिनकर
नेहा नाटेकर
Mr. Ebenezer Harding

**मुद्रण :**
व्यंकटेश प्रिंटर्स, पुणे.

**मुखपृष्ठ व सजावट :**
श्री. संजीव शिंदे

**Printed & Published by** : Cochlea Pune for Hearing and Speech

**Owned by** : Cochlea Pune for Hearing and Speech

**Printed by** : Sanjeev V. Shinde
Paud Road, Kothrud, Pune.

**Published at** : Cochlea Pune for Hearing and Speech
161-A, Modibaug, Shivsagar Society,
Near Mhasoba Gate, Shivajinagar, Pune 411 016.

**Editor** : Dr. Avinash Madhav Wachasundar

# EDITORIAL

**- Mrs. Manasee Date**

The Annual Gathering of Swaranaad on 30th November was a great success. As usual this year also the graph has risen in bounds and leaps.

Our chief guest was Dr.Avinash Moharil Sir, Senior professor of SP College. With his innovative programs to develop the skills of the students of SP College, the College was given the 'Best College award' and he has contributed to maintain the 'A' grade of NAAC. He appreciated the perfect timing of each performance, not to mention the one minute in which all the teachers and staff got together for the group photo without any chaos. He gave an applause to the tremendous efforts of the teachers and staff and also to Raksha madam who is their idol. Sreekumar Shankar sir also graced the gathering with his presence. He is a graduate of BITS Pilani in chemical engineering and has contributed in the field of natural gas. At present he is Administrative Director of MNGL.

Dr.Avinash Wachaundar sir has given a write up where he and Dr.AkshayWachasundar have completed more than 300 cochlear implants.

Then there is this story of the three teachers (who are also mothers of hearing-impaired children and the first batch to do DTYHI), is very interesting. It describes their journey from an ordinary woman to a special teacher. They had never been out of Pune and how they were thrilled when they attended NCED, National Convention for Education of the Deaf at Kerala in 2011. How they were motivated to listen to all the lectures and presentations. And now they take part in organising CRE by Cochlea.

Hema Natu was born deaf in a family of 16 hearing impaired people. She struggled to become a teacher for the HI children. She has given a very nice write up of her journey from childhood and how her passion for reading helped her to become a teacher.

A mother also has given a write up and how they were shocked to know that their child is hearing impaired. How they had to struggle to bring the child to Pune for therapy, how they had to spend all the money they had collected for implant after they both had an accident on the bike, and at last how she settled in Pusalkar Swaranaad at Urawade after their son's cochlear implant.

Our matron at Urawade has also given a write up from another point of view as she is in touch with the children and their mother's day and night. She can understand their problems and how staying away from the family is difficult. Sometimes leaving a normal child with the family, for the benefit of the hearing impaired child. Every mother has a different story. But with our mission of 'Yes, every child will speak' we try to solve the problems of this people.

◆◆◆

## यशामागून येणारे आत्मचिंतन नेहमीच गरजेचे

**डॉ. अविनाश वाचासुंदर**
मुख्य कार्यकारी विश्वस्त

दरवर्षी स्नेहसंमेलनाच्या निमित्त आपण स्मरणिका काढतो. दरवेळेला त्यामध्ये आपल्या विषयाशी संबंधित काही लेख लिहिले जातात. यावेळचा विषय परिवार किंवा कुटुंब असा आहे. त्या संबंधात विचार करताना मला असे वाटते, आपल्या कर्णबधिर मुलांच्या पुनर्वसनामध्ये अनेक विभाग आहेत. उदाहरणार्थ, ऑडिओमेट्री, स्क्रीनिंग कॅम्प, हिअरिंग एड्स, कॉक्लिअर इम्प्लांट आणि मुख्यत्वे करून चालणारा प्रशिक्षणाचा भाग. ही सर्व एका फॅमिलीतलीच पदे किंवा सभासद आहेत, असे म्हटले तर गैर होणार नाही. म्हणून या वेळच्या स्मरणिकेमध्ये थोडेसे कॉक्लिअर इम्प्लांट बद्दल चिंतन करू.

त्याचे असे झाले एवढ्यातच आपण ३०० कॉक्लिअर इम्प्लांटचा टप्पा पार पाडला. ३०० शस्त्रक्रिया होणे आणि त्याही यशस्वी होणे, हा एक अत्यंत सौभाग्यशाली प्रसंग आहे. त्यानिमित्ताने आपण या ३०० यशस्वी शस्त्रक्रियांच्या प्रित्यर्थ एक समारंभ आयोजित केला होता. तीनशे मधील सव्वाशे मुलांच्यापर्यंत आपण पोचलो होतो. त्यापैकी एकशे दहा मुले या सोहळ्यासाठी उपस्थित होती. कार्यक्रमाच्या सुरुवातीला इम्प्लांट झालेल्या मुलांचे प्रेझेंटेशन ठेवले होते. सहा वर्षांच्या निरजा घोडके पासून सुरुवात झाली. तिने गीतेतील एक अध्याय तोंडपाठ म्हणून दाखवला. अवघड संस्कृत देखील ती व्यवस्थित बोलत होती. त्यानंतर देवांश पाटील या दहा वर्षाच्या मुलाने आपल्या वडिलांशी स्पष्ट बोलून संवाद साधला. त्यानंतर आसावरी कुलकर्णीने आपण इंजिनियर कसे झालो आणि आता कोणतेही व्यंग नसलेल्या मुलाशी विवाहबद्ध होत आहोत, अशी आपली सक्सेस स्टोरी सांगितली. ३५ वार्षाच्या एका महिलेने आपल्या जीवनात कॉक्लिअर इम्प्लांटने कसा पॉझिटिव्ह बदल झाला, हे प्रत्यक्ष बोलून सांगितले. ऑडिटोरियममध्ये उपस्थित असलेली सुमारे ८०० मंडळी हे सर्व ऐकून भारावून गेली, चकित झाली.

अशा तऱ्हेने ३०० मुले आपण इम्प्लांटची सर्जरी झाल्यानंतर मेन स्ट्रीम केली, याचा कार्यक्रम साजरा झाला. या कार्यक्रमासाठी पिंपरी–चिंचवडचे आमदार शंकरभाऊ जगताप हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. प्रसिद्ध उद्योजक जितेंद्र सोनिग्रा आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे क्षेत्रीय संपर्कप्रमुख कैलासजी सोनटक्के, तसेच औंध सिविल हॉस्पिटलचे सीनियर ऑर्थोपेडिक सर्जन डॉ. गरड यांच्या विशेष उपस्थितीमध्ये हा कार्यक्रम पार पडला. आपल्या सर्व परिवारासाठी ही एक अत्यंत आनंदाची व अभिमानाची गोष्ट आहे यात शंका नाही. तसेच यामध्ये सर्व जणांचे टीमवर्क महत्त्वाचे ठरते. कान, नाक, घशाचे सर्जन निदान आणि ऑपरेशनसाठी, ऑडिओलॉजिस्ट ऑडिओमेट्री श्रवण यंत्र मॅपिंग इत्यादीसाठी, तर सात वषापर्यंत या सर्व मंडळींना वाचाभाषा प्रशिक्षण देणारे आपले शिक्षक आणि थेरपिस्ट, या सर्वांचा सहभाग यामुळेच या तीनशे शस्त्रक्रिया यशस्वी झाल्या, असे म्हणता येईल. त्यामुळे आपल्या सर्व लोकांचे अभिनंदन. आपल्या सर्वलोकांना शाबासकी. परंतु हा सर्व कार्यक्रम करत असताना काही त्रुटी देखील लक्षात

◆◆◆

आल्या, त्यामध्ये सगळ्यात महत्त्वाची गोष्ट जी लक्षात आली ती अशी आहे की, आपण आपल्या केंद्रांमधील मुलांच्या बाबतीत चांगल्या प्रकारे सतर्क असतो पण भौगोलिक दृष्ट्या लांब असलेल्या विभागातील कॉक्लिअर इम्प्लांट झालेल्या मुलांच्या संदर्भात वाचा–भाषा प्रशिक्षण नीट होत आहे किंवा कसे, याबाबत आपण पुरेसे जागरूक नाही किंवा त्यांच्याशी याबाबतीत जेवढे समुपदेशन होणे किंवा चर्चा होणे अपेक्षित आहे किंवा जरुरीचे आहे तेवढे घडत नाही. तसेच आपल्या स्वरनाद शाळेतून आपला शिक्षणक्रम पूर्ण करून बाहेर पडलेल्या कर्णबधिर मुलांशी किंवा त्यांच्या पालकांशी जेवढ्या प्रमाणात आपला संपर्क शाळेतून बाहेर पडल्यावर असणे अपेक्षित आहे तसा तो काही कारणांनी पुरेसा राहत नाही. त्यामुळे पालकांना जरी ऑपरेशन मुळे खूप फायदा झाला असे वाटत असले, तरी प्रत्यक्ष मुलाला असणारे स्पीच समाधान–कारक वाटले नाही.

थोडक्यात ऑपरेशन झाल्यानंतर जास्त पाठपुरावा करणे अपेक्षित आहे, जरुरीचे आहे. त्यासाठी योग्य ती रचना करावी लागेल. तसे झाले नाही तर सर्जन ऑपरेशन करत राहतील. पालकांना ऑपरेशन झाल्याचे समाधान राहील. पण त्यातून योग्य ते लाभ म्हणजे बोलणारी मुले, ऐकणारी मुले तयार होतील, असे नाही किंवा प्रभावीपणे बोलणारी मुले तयार होतील असे नाही. यातून कदाचित एक निराळी समस्या पुढे येईल अशी भीती वाटते. ज्या मुलांना वाचाभाषा प्रशिक्षण दिले गेले नाही, अशी मुले आपोआपच स्पेशल स्कूलमध्ये जातील. साईन लँग्वेज शिकतील आणि बोलण्याखेरीज आपली प्रगती करुन घेतील. जसे की आत्ताची स्पेशल स्कूल आहेत. आणि ज्यांना श्रवणयंत्रानंतर किंवा कॉक्लिअर इम्प्लांट नंतर व्यवस्थित वाचाभाषा प्रशिक्षण मिळाले आहे, ती सर्व मुले मेन स्ट्रीम होतील. पण धड इकडची नाही म्हणजे बोलणारी नाहीत किंवा साईन लँग्वेज ही नाही अशी मुले तयार होण्याची शक्यता दिसत आहे आणि तो एक निराळाच प्रॉब्लेम तयार होईल. यासाठी कॉक्लिअर इॅम्प्लांट करताना विशेष काळजी घ्यावी लागेल. सर्जरीनंतर वयाच्या सहा–सात वर्षांपर्यंत व्यवस्थितपणे वाचा भाषा प्रशिक्षण मिळते आहे, हे ऑपरेशनच्या अगोदरच ठरवले गेले पाहिजे. तशी कल्पना पालकांना दिली गेली पाहिजे. त्यांची वाचा भाषा प्रशिक्षण मिळवण्यासाठी जरूर असेल तेथे प्रवास करण्याची मानसिकता तयार केली पाहिजे. किंबहुना त्यांच्या निवास–स्थानाजवळ जास्त प्रवास करायला न लागता ही सोय उपलब्ध होईल, असे बघितले पाहिजे. असे असेल तरच कॉक्लिअर इम्प्लांट सर्जरी करण्यात मजा आहे. नाहीतर त्याचा काहीही उपयोग नाही. हे या तीनशे ऑपरेशनच्या कार्यक्रमानंतर लक्षात आले.

आपण यापुढील ऑपरेशन करताना या विषयाबाबत जास्त काळजी घेऊ पालकांचे कॉन्सिलिंग करू आणि ऑपरेशन नंतर ही मुले चांगली बोलणारी आणि ऐकणारी होतील असे बघू कारण आपले ब्रीद वाक्य आहे, “होय प्रत्येक कर्णबधिर मूल बोलेल..”

◆◆◆

# वार्षिक स्नेहसंमेलन

– नेहा नाटेकर
समुपदेशक, स्वरनाद कोथरुड

वार्षिक स्नेहसंमेलन म्हणजे शालेय सोहळा. या सोहळ्याची तयारी सगळेजण जोशात आणि आनंदात करत असतात. जसे की विद्यार्थ्यांचे नृत्य, नाटक बसवणे, स्टेज सजवण्यासाठीची तयारी इत्यारी... हे सर्व करत असताना पटापट दिवस निघून जातात आणि अखेर वार्षिक स्नेहसंमेलनाचा दिवस येतो.

दरवर्षीप्रमाणे कॉक्लिआ पुणे फॉर हिअरिंग अॅण्ड स्पीच संचलित स्वरनाद कर्णबधिर बालकांच्या पुनर्वसन केंद्राचे वार्षिक स्नेहसंमेलन दिनांक ३० नोव्हेंबर २०२५ रोजी पंडित भीमसेन जोशी कलामंदिर, औंध येथे उत्साहात आणि जोशात पार पडले.

कार्यक्रमाची सुरुवात दीप प्रज्वलनाने आणि कार्यक्रमलाला लाभलेल्या प्रमुख पाहुण्यांच्या स्वागताने झाली. यावर्षी वार्षिक स्नेहसंमेलनासाठी माननीय प्रमुख पाहुणे म्हणून श्री. कुमार शंकर आणि त्यांच्या पत्नी लाभले होते. श्री. कुमार शंकर यांनी भारताच्या नॅचरल गॅस क्षेत्रात अत्यंत मोलाचे योगदान दिले आहे. ते महाराष्ट्र नॅचरल गॅस लिमिटेड (एम एन जी एल) चे व्यवस्थापकीय संचालक आहेत. दुसरे प्रमुख पाहुणे म्हणून लाभलेले डॉ. अविनाश मोहरील हे पुण्यातील – सर परशुराम भाऊ, ह्या नामवंत महाविद्यालयाचे प्राचार्य आहेत. आपल्या कार्यक्रमाला लाभलेल्या पाहुण्यांचे स्वागत आणि सन्मान अनुक्रमे कॉक्लिआ पुणे संस्थेचे मुख्य कार्यकारी व्यवस्थापकीय विश्वस्त डॉ. अविनाश वाचासुंदर आणि संस्थेच्या कोषाध्यक्षा व संचालिका सौ. रक्षा देशपांडे यांच्या शुभहस्ते करण्यात आले.

सर्वांनाच उत्सुकता असलेल्या सांस्कृतिक कार्यक्रमाची सुरुवात चिमुकल्यांनी सादर केलेल्या भूपाळीने झाली. यावर्षी सांस्कृतिक कार्यक्रमाचा विषय महाराष्ट्राची लोकधारा हा होता. या संकल्पनेवर आधारित संस्थेच्या कोथरूड, नारायणगाव, मंचर, चिंचवड, पिंपरी, दौंड व उरवडे येथील निवासीकेंद्रातील मुलांनी संस्कृती, श्रद्धा, परंपरा आणि महाराष्ट्रातील लोकांचे दैनंदिन जीवन अशा विविधतेने नटलेल्या आपल्या महाराष्ट्र राज्याला नृत्यातून सादर केले. तसेच आपल्या माजी विद्यार्थ्यांनी ह्या विषयाला अनुसरून गाणे आणि छोटे भाषण सादर केले.

कॉक्लिआ पुणे वार्ताच्या वार्षिक अंकाचे प्रकाशन कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे श्री. कुमार शंकर आणि डॉ. अविनाश मोहरील तसेच संस्थेचे व्यवस्थापकीय विश्वस्त डॉ. अविनाश वाचासुंदर आणि संस्थेच्या कोषाध्यक्षा व शिक्षण संचालिका सौ. रक्षा देशपांडे यांच्या हस्ते झाले.

स्नेहसंमेलनाच्या कार्यक्रमातला एक महत्त्वाचा सोहळा ज्यांची सगळेजण आतुरतेने वाट बघत असतात तो म्हणजे बक्षीस वितरण सोहळा. यावर्षी देखील दहावी व

बारावीच्या परीक्षेत यश मिळवलेल्या तसेच आपल्या संस्थेतील पोस्ट ग्रॅज्युएट झालेल्या माजी विद्यार्थ्यांना बक्षीसे देण्यात आली.

त्याचप्रमाणे विशेष प्राविण्य मिळवलेल्या माजी विद्यार्थ्यांचे कौतुक करण्यात आले. आदर्श विद्यार्थी, आदर्श पालक व आदर्श शिक्षिका हे पुरस्कार सुद्धा स्नेहसंमेलनात देण्यात आले.

अशाप्रकारे पाहुण्यांनी व्यक्त केलेल्या मनोगतामुळे आणि त्यांनी केलेल्या कौतुकामुळे वार्षिक स्नेहसंमेलनाचा सोहळा अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.

◆◆◆

**१० वी पास विद्यार्थ्यांची नावे**

१. आर्यन जाधव
२. सुर्यकांत धोत्रे
३. ओमकार शिंदे
४. रेहान मुलानी
५. किर्ती चलवा
६. रेहान महात
७. शरयू निघोट
८. उदयराज शिंदे
९. पूनम खंडारे

**१२ वी पास विद्यार्थ्यांची नावे**

१. तनया गायकवाड
२. सिद्धी गेगंजे
३. सुमित गांधिले
४. सृष्टी म्हेत्रे
५. आर्यन नाणेकर

**पोस्ट ग्रॅज्युएट विद्यार्थी**

१. प्रथमेश सावंत – MCA

**विशेष प्राविण्य मिळवलेल्या विद्यार्थ्यांची नावे**

१. ओम साठे
२. मृणाल बागल
३. आयुष कलाल
४. आरुष डफळ

**आदर्श शिक्षिका**

१. **माधुरी पोतदार**, स्वरनाद कोथरुड
२. **वनिता शिळीमकर**, स्वरनाद कोथरुड
३. **अस्मिता फावडे**, स्वरनाद कोथरुड
४. **कांचन बागल**, मंचर

**आदर्श पालक**

१. **पुजा शिंदे**, कोथरुड
२. **देवानंद ओव्हाळ**, कोथरुड
३. **मयुरी टाकळकर**, उरवडे

**आदर्श विद्यार्थी**

१. **प्रेम पवार**, कोथरुड
२. **शिवराज वाबळे**, उरवडे

## आमची पहिली C R E

**शांती रोकडे, भारती तांबे,**
**मनिषा मोहिते**
विशेष शिक्षिका, कोथरुड व पुसाळकर स्वरनाद

नमस्कार, आम्ही विशेष शिक्षिका इथे मी असा उल्लेख न करता आम्ही असं म्हणते. कारण आम्ही विशेष शिक्षिका ज्या कारणामुळे एकत्र आलो ते म्हणजे आमची कर्णबधिर मुले. या आमच्या कर्णबधिर मुलांना प्रशिक्षण देता देता आम्ही विशेष शिक्षिका झालो.

मी, भारती, मनिषा अशा तिघीजणी एक सामान्य आई ते विशेष शिक्षिका आणि छान मैत्रिणी.. असा आमचा प्रवास, हा प्रवास नक्कीच सोपा नव्हता. पण जशी लहान मुलं आपल्या आईच्या हाताला धरून कशी बिनधास्त रस्त्यावरून चालतात ना.. तसं आमचा हात पकडला रक्षा मॅम आणि आमचे वाचासुंदर सर या दोघांनी.

त्यावेळेसचा DTYHI हा कर्णबधिर मुलांच्या प्रशिक्षणासाठीचा कोर्स आम्ही तिघींनी सोबतच केला आणि एक सामान्य आई विशेष शिक्षिका झाली. आम्ही मुलांना शिकवत होतो. रक्षा मॅमचे तसेच आमचे इतर क्लासमेट म्हणजे आमची पहिली DTYHI ची बॅच यांचे सहकार्य, मार्गदर्शन होते.

NCED बद्दल रक्षा मॅम सांगायच्या CRE बद्दल बोलायच्या. त्यात काय काय शिकायला मिळते हे सांगायच्या पण खरं सांगायचं तर त्यावेळी इतकं विशेष वाटत नव्हतं.

२०११ सालची NCED केरळ येथे होणार हे सांगुन मॅमने आम्हा सर्व विशेष शिक्षिकांना तिकडे जाण्यासाठी तयार केले. कधीच इतका दूरचा प्रवास केलेला नाही, मुलांना सोडून राहिलो नाही. हे असे असताना देखील सर्वजणी तयार झालो या प्रवासासाठी. एक आगळा वेगळा प्रवास होता तो आमच्यासाठी. आमच्या बोलता न येणाऱ्या पिल्लांना सोडून दहा दिवस इतक्या दूर राहायचं ही सोपी गोष्ट नव्हती. पण रक्षा मॅमने समजूत काढली व तयार झालो.

आमची पहिली बॅच निघाली केरळला. आम्हा तिघींना तर हा नवीन अनुभव होता. तीन दिवस आम्ही रेल्वेमध्ये राहिलो. जाण्याआधी CRE चे विषय, त्याबद्दल चर्चा झालेलीच होती. पण वाचासुंदर सरांनी डायरीमध्ये प्रवासादरम्यानची ठिकाणे त्यांची नावे लिहुन ठेवा असे सांगितलेलं आणि आम्ही ते फॉलोही करत होतो. ट्रेनचा प्रवास आमच्यासाठी रक्षा मॅमने केलेला सामान्य बोगीतील प्रवास, ट्रेनमध्ये आलेले अनुभव एकमेकींशी मारलेल्या गप्पा, गाणी, चेष्टा, गंमती-जंमती, एका राज्यातुन दुसऱ्या राज्यात जाताना होणारा भाषेतील बदल, त्यामुळे येणारी मजा या सर्वांमुळे तो प्रवास अविस्मरणीय होता.

तिथे पोहोचल्यावर जिथे कॉन्फरन्स होणार तिथेच जवळ राहण्याची सोय होती. या प्रवासात आम्ही सर्व एक कुटुंब बनलो आणि रक्षा मॅमकडून खूप गोष्टी शिकलो. आमच्यासाठी त्या सामान्य सुविधांमध्ये हसुन-खेळून राहत होत्या. कुठलेही आढे-वेढे नाही, तक्रार नाही. त्यामुळे सर्वजणी एकत्र होतो. वाद नाही, राग नाही फक्त आनंद आणि जगण्यातला मोकळेपणा अनुभवला.

CRE चा पहिला दिवस सर्वजणी तयार होऊन छान अटेंड कला. एक वेगळाच अनुभव सर्व कार्यक्रमाचे सुंदर नियोजन तिथल्या (केरळ) संस्कृतीचे दर्शन खूप छान होते. CRE चे काही विषय खूप छान तर काही कठीण वाटत होते पण सहकारी समजाऊन सांगत होत्या. CRE मुळे हे समजले की आपल्यासारख्या अजुन अनेक संस्था दिव्यांग क्षेत्रात खूप चांगले काम करत आहेत. आपल्या महाराष्ट्रातील विशेष शिक्षिका पाहून त्यांना भेटून तर एक वेगळाच आनंद झाला. सकाळी CRE अटेंड करून आम्ही संध्याकाळी, रात्री त्यावर चर्चा करायचो. जे समजलं नाही ते इतर सहकारी समजाऊन सांगायचे. CRE मध्ये पेपर प्रेझेंटेशन करणारे विशेष शिक्षक बघुन भारी वाटायचं आणि विचार यायचा की आपल्यामध्ये येईल का असा आत्मविश्वास कारण ती फक्त सुरुवात होती आमच्यासाठी.

CRE मध्ये राहण्याची, जेवणाची, हॉलची उत्तम सोय होती. दिवसभराच्या सेशनमध्ये काही शिक्षक मध्येच गायब व्हायचे. आम्हाला समजायचेच नाही. पण नंतर मॅमकडून कळायचे ते लोक बाहेर फिरून येतात. मला सांगायला खूप अभिमान वाटतो की आपली कॉक्लिआ ही एकच अशी टीम होती एकही प्रेझेंटेशन मिस न करणारी आणि हा नियम रक्षा मॅमने तेव्हाच सांगितलेला. पूर्ण लेक्चर अटेंड करून मग बाहेर पडायचो. २०११ पासून ते आत्तापर्यंत आम्ही हा नियम पाळतो. आपली कॉक्लिआ टीम ही पूर्ण तीन दिवस सर्व सेशन अटेंड करते. या CRE मध्ये खूप गोष्टी शिकलो आम्ही. कर्णबधिरत्त्व या शिवाय इतर अपंगत्व ही आहेत. त्यासाठी झटणाऱ्या शिक्षकांची वेगळीच लढाई आहे. आणि आपल्या कर्ण बधिर मुलांना शिकवण्या-साठीच्या खूप पद्धती समजल्या. तसेच तिथे काही पेपर प्रेझेंटेशन ऐकून आपण तर असंच करतो हे ही समजले.

कॉक्लिआ संस्थेत काम करणाऱ्या विशेष शिक्षिका या CRE मुळे जवळच्या मैत्रिणी बनलो. प्रवासात एकमेकींची सोबत करायची, एकमेकींना सांभाळून घ्यायचे आणि एकमत ठेवायचे या गोष्टी शिकलो. या CRE मुळे झालेली आमची मैत्री अजूनही तशीच आहे.

CRE मुळे घरातून बाहेर पडलो आणि एका नवीन जगाची ओळख झाली. रोजच्या धकाधकीच्या आयुष्यात विसावा मिळाला. स्वतःची नव्याने ओळख झाली. माझे स्वतंत्र अस्तित्व आहे हे समजलं. रक्षा मॅमची प्रत्येकी साठीची काळजी कळली जी

आजही आहे. एकमेकींच्या सहवासात स्वभाव समजले. आपण बाहेर असलो तरी ही आपले कुटुंब आपल्या मुलांना सांभाळू शकते, काळजी घेऊ शकते हे समजले. प्रवासादरम्यान स्वतःची काळजी आपल्या सहकार्याची काळजी घेणे शिकलो. CRE निमित्ताने केरळ भेट म्हणजे आनंददायी प्रवास होता. ज्याने आम्हाला खूप समृद्ध केले.

कन्याकुमारी भेट, कन्याकुमारी देवी मंदिर भेट, मिनाक्षी मंदिर, पद्मनाभ मंदिर, कन्याकुमारी समुद्रावरचे सोबतचे सर्वांनी अनुभवलेले क्षण या सर्व गोष्टी आम्हाला नवीन उर्जा, आनंद, उत्साह देऊन गेल्या. विशेष शिक्षकांनी CRE नक्की करावी, नवनवे अनुभव, शिक्षण पद्धती यांची देवाण–घेवाण करावी. आपल्या मुलांना जास्तीत जास्त चांगल्या पद्धतीने प्रशिक्षण देता यावे. यासाठी CRE मधुन खूप मार्गदर्शन मिळत असते.

आमची पहिली CRE आम्हाला आमच्या आयुष्यातील अविस्मरणीय अशा अनेक चांगल्या, आनंददायी, आत्मविश्वास वाढवणाऱ्या गोष्टी देऊन गेली. त्याबद्दल रक्षा मॅम, डॉ. वाचासुंदर यांचे मनापासून धन्यवाद....!

◆◆◆

**Your generosity can make a deaf child Speak**

Cochlea is registered under :
BPT 1950 Act.
Society Reg. Act.
PAN No. AAATC5056E

| | | |
|---|---|---|
| Account Name | : | 'Cochlea Pune for Hearing and Speech' |
| Account No. | : | 60040230428 |
| Bank | : | Bank of Maharashtra |
| Branch | : | Shivajinagar, Pune. |
| IFSC Code | : | MAHB0000043 |

**All Donations are exempt under section 80G of the Income Tax Act.**

## अफाट वाचन, समृद्ध भाषेचे जनक

**हेमा नातू**
विशेष शिक्षिका – स्वरनाद कोथरुड

अनेकजण स्वप्न बघत असतात. याप्रमाणे माझेही स्वप्न होते. विशेष शिक्षिका व्हायचे, याचे कारण माझ्या बालपणात आहे.

मी स्वतः कर्णबधिर असून कुटुंबातले १६ जण कर्णबधिर आहेत. पण माझ्या बाबतीत स्थानिक खुणा / ISL साईन लॅग्वेज. तसेच घरातले पोषक वातावरण म्हणजे, शिस्त, संवाद, वाचन, गप्पाटप्पा, शब्दकोडे इ. गोष्टींमुळे तसेच १ वर्ष स्पीच थेरपी (लिपरिडींग) यामुळे ही माझ्यातल्या भाषेचा कळत नकळत विकास झाला यातून मी आज उत्तमरितीने बोलू शकते.

शालेय जीवनात अनेकदा कर्णबधिर मैत्रीणी वेळोवेळी माझ्याकडून विषयातील धडा समजून घेण्याचा प्रयत्न करायच्या. मी ही आपल्या परीने मदत करयची. यातून मला शिकवण्याची गोडी लागली. भाषा हा माझा आवडता विषय होता. खरे तर कर्णबधिर मुलांना भाषेपेक्षा गणित सोपा वाटतो. पण माझे उलटे होते. याचे मूळ कारण माझे लहान वयातले अफाट वाचन.

वाचनाची सुरुवात ही प्रवासाच्यावेळी लांब गावी जाताना एस.टी. किंवा बस. तेव्हा मी कंटाळून जायची हे जाणून मावशी मला खिडकी बाहेर प्रत्येक स्टॉपवरची पाटी वाचायला लावायची. घरी गेल्यावर मावशी आठवणीने सांगायची, कुठला कुठला स्टॉप लागला यावर मी आठवून आठवून सांगायची यातून माझी स्मरणशक्ती, निरीक्षणशक्ती यांचा विकास झाला. पुढे घरी वर्तमानपत्र, चांदोबा, चंपक अशी पुस्तके काका आणून द्यायचे तसेच वाढदिवशी नेहमी गोष्टीचे पुस्तक मिळायचे. यातून मी वाचायला लागले. हळूहळू जेव्हा श्यामची आई हे पुस्तक माझ्या हातात पडले मी अधाशीपणे वाचले आणि डोळ्यात पाणी आले. यानंतर वाचनाचा झपाटा वाढत चालला हे जाणून काकांनी मृत्यूंजय, राधेय अशी मोठी कांदबरीची पुस्तके आणली आणि मी पूर्ण वाचून घेतले खरंच किती सुंदर ओघवती भाषा! अशाप्रकारे या वाचनामुळे माझी भाषा खूप समृद्ध झाली. नकळतपणे वाचनाची गोडी लागली. याच वाचनामुळे क्लास न लावता स्वतः अभ्यास करुन कॉलेजमधले शिक्षण पूर्ण केले.

बी.कॉम झाल्यावर लगेच बी.जे.मेडिकल कॉलेज (ससून) मध्ये ज्युनिअर क्लार्क म्हणून ६ वर्ष काम केले. नंतरही अनेक वेगवेगळ्या कामाचा अनुभव घेतला तरीही मी समाधानी नव्हते. तेव्हा कै. शुभदा जोशी बाईंनी मला DECSE (HI)

# NCED – INDIA INTERNATIONAL CONFERENCE 2026

Date: 7th – 9th January 2026

**ORGANIZED BY**

**NATIONAL CONVENTION OF EDUCATORS OF THE DEAF – INDIA, MAHARASHTRA CHAPTER**

in collaboration with AYJNISHD(D) and COCHLEA-Pune

Venue: Amphitheatre Fergusson College, F.C. Road, Shivaji Nagar, Erandwane, Pune, Maharashtra 411004.

**THEME :**

**Inclusive Education through Disability Perspectives and Research**

## पुसाळकर स्वरनाद, उरवडेच्या मुलांचा गरजा महाराष्ट्र माझा



## स्वरनाद कोथरुडच्या मुलांनी दाखवली खेड्यातील दिनचर्या







दौंडच्या मुलांनी सादर केलेले
**कोळी नृत्य**



आराध्य वेळेने
एक गाणे सादर केले.



निरजा घोडके
मेरी झासी नही दूंगी...





कार्यक्रमात रंगून गेलेले प्रमुख पाहूणे



किआंष काळे
स्वरनाद शाळेबद्दल कृत्यज्ञता
व्यक्त करताना







**DECSEHI**
**प्रशिक्षण पूर्ण करणाऱ्या उत्तीर्ण विद्यार्थिनी**

**श्री. कुमार शंकर आणि डॉ. अविनाश मोरिल आपले मनोगत व्यक्त करताना**







**१० वी आणि १२ वी पास झालेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार**



**माजी विद्यार्थी व शिक्षिका झालेल्या त्यांच्या मातां समवेत**

कोर्स करायला सांगितले आणि तो कोर्स पूर्ण करुन स्वरनाद संस्थेत पहिली आले आणि याच संस्थेत विशेष शिक्षिका म्हणून रुजू झाले. ते केवळ डॉ.वाचासुंदर सर, सौ. रक्षा देशपांडे मॅडम, कै. शुभदा जोशी बाईंमुळेच. अशा प्रकारे माझे विशेष शिक्षिका होण्याचे स्वप्न पूर्ण झाले.

जेव्हा स्वरनाद शाळेत विशेष शिक्षिका म्हणून रुजू झाले तेव्हा लहान गोड निरागस मुले बघून मला त्यांच्याशी त्यांच्या भाषेत बोलावसे वाटायचे. जेव्हा कर्णबधिर मुले माझ्याशी बोलताना हावभावासहित व्यक्त होतात. मी ही त्यांच्याशी त्यांच्या भाषेत बोलण्याचा प्रयत्न करते याचे कारण सुरुवातीचे मूल हे भाषेशिवाय शाळेत आलेली असतात. त्यांच्याकडे भाषा नसते पण हावभाव, डोळे यातून संवाद साधून बघतात ते पण समजून घेऊन सावकाशीने शांतपणे संवाद साधत ते सुद्धा हसत खेळत, जबरदस्ती न करता तरच मुले आवडीने बोलायचा प्रयत्न करतील.

एक किस्सा देत आहे. एकदा एक डेफ पालक होते. त्यांना अजिबात बोलता येत नव्हते. पालकाचे तोंड अगदी पूर्णपणे बंदच होते म्हणजे आवाजच काढायचे नाही. त्यांची पार्श्वभूमी बघता त्यांनी स्पीच थेरपी घेण्याऐवजी खुणेचा वापर केल्याचे लक्षात आले, मी त्या पालकांना तोंड उघडून बोलायला सांगितले. ती म्हणाली, माझा आवाज विचित्र असल्याने मला लाज वाटते. अशावेळी मी धीर दिला, या शाळेत कोणीही तुला हसणार नाही. हळूहळू का होईना तिने प्रयत्नपूर्वक तोंड उघडून थोडे थोडे शब्द बोलायला सुरुवात केली. त्या पालकांचे बघून पाल्य ही बोलायचा प्रयत्न करु लागले. यातून दोघींचाही आत्मविश्वास वाढला. आज पाल्य अभ्यासातही हुशार आहे. एक शिक्षिका म्हणून तिची प्रगती पाहून खूपच समाधान वाटते.

यानंतरही शाळेतले काही कर्णबधिर पालक पण असतात. त्यांना मी साईन लॅग्वेजच्या माध्यमातून मार्गदर्शन करुन त्या पालकांच्या व मुलांच्या सर्वांगीण प्रगतीसाठी प्रोत्साहन देते. त्यांना स्पीच थेरपी व वाचनाचे महत्व समजावून सांगते.

हेच पालक जेव्हा ताई, तुम्ही मुलांना छान समजून शिकवता त्यामुळे मुलांच्या आयुष्याला आनंद मिळवून दिलात असे म्हणतात. तेव्हा खूपच समाधान वाटते.

आता मी समाधानी असले तरी अजून मला शिकायचे आहे कारण काळाच्या ओघात शिक्षणपद्धती बदलली आहे. ती आत्मसात करुन वाटचाल करायची आहे.

आताच्या जमान्यात सोशल मिडीयामुळे मी ISL साईन लॅग्वेज आत्मसात करु शकले. आमच्या लक्षात आले की, काही पालक साईन लॅग्वेजला नाक मुरडतात वा त्यांना भिती वाटते की साईनमुळे मुले बोलणार नाही, हा भ्रम आहे.

उलट थोडीफार साईन व स्पीच दोन्ही एकत्रित वापरामुळे आकलनात वाढ होऊन स्पीचमध्ये प्रगती होते. पुढे जाऊन तीच मुले मोठेपणी डेफ कम्युनिटीमध्ये वा नॉर्मल समाजात आत्मविश्वासाने वावरतील.

माझी पालकांना कळकळीची विनंती आहे, मुलांना छान गोष्टीची छोटी पुस्तके भेट म्हणून द्या. तीच पुस्तके घेऊन त्यांच्यासोबत बसून स्वतः गोष्टीचे वाचन करुन मुलांना गोष्ट हावभावासहित समजावून सांगा मगच त्यांच्याकडून गोष्टीचे वाचन करुन घ्या. मग बघा मुले उत्सुकतेने गोष्टीची पुस्तके हाताळतील, बघतील, वाचतील. पुस्तक नसल्यास साधे वर्तमानपत्रातील ठळक मथळा, तारीख, वार पेपरचे नाव इ. वाचायला लावा. पण आधी केले मग सांगितले या उक्तीप्रमाणे पालकांनी वागले पहिजे, तरच मुलांची भाषावाढ होईल. सुरुवातीला खूप कष्ट असले तरी कष्टाची फळे खूप छान असणार आहेत. यांची खात्री बाळगा.

◆◆◆

# कविता

**जयश्री शेळके**
विशेष शिक्षिका, स्वरनाद, कोथरुड

कोण म्हणतं कर्णबधिर मूल बोलत नाही,
कोण म्हणतं ऐकत नाही।
स्वरनादमध्ये या तर खरं,
सर्वसामान्य शाळेत गेल्याशिवाय राहत नाही।।

करावे लागतात सर्वांनाच कष्ट,
ऐकण्यासाठी, बोलण्यासाठी, वाचनासाठी।
ज्ञानाच्या सागरात बुडण्यासाठी,
यशाचे शिखर गाठण्यासाठी।।

कॉक्लिआमध्ये जो येतो,
तो सार्थकी होऊन जातो।
प्रेमाने, सन्मानाने, आधाराने,
नवचैतन्याने बहरतो।।

पडला का प्रश्न...,
कुणाचा आधार? कुणाचा विचार ?
कॉक्लिआचा आधार, रक्षा ताईंचा विचार,
त्याच माऊलीने केला हा निर्धार।।

घडवले अनेक शिक्षक,
जे अंतःकरणातून शिकवतील।
आपल्या मुलांबरोबरच,
इतर मुलांनाही छान घडवतील।।

## कर्णबधिर मूलं घडविताना आलेली आव्हाने आणि केलेली मात

सौ.मंगल रोहन बोंबले
पालक – स्वरनाद कोथरुड

कर्णबधिर म्हणजे ज्याला ऐकू येत नाही आणि त्यामुळे बोलता येत नाही. कर्णबधिर मुलं मी समाजात एक–दोन पाहिली होती. पण त्यावेळेस मला फक्त एवढेच जाणवलं की, अरे रे... देवाने मला किंवा हिला कशाची तरी शिक्षा दिली असेल. व त्याच्या बद्दल एक बिचारी मुलं अशीच भावना माझ्या मनात येत असायची.

पण जेव्हा माझा मुलगा श्रीराज याला ऐकू येत नाही असे जेव्हा डॉक्टरांनी सांगितले तेव्हा तर माझ्या पायाखालची जमिनच सरकली. मी व त्याचे बाबा आम्ही पुण्याला बेरा चाचणी करुन तिचे रिपोर्ट ऐकले व दोन तासाचा प्रवास करुन घरी आलो तेव्हा फक्त डोक्यामध्ये विचारांचा गोंधळच चालू होता. आम्ही दोन तासांच्या प्रवासात निःशब्द होवून बसलो होतो. घरी आल्यावर मात्र मनाचा बांध सुटला आणि आम्ही दोघेही ढसाढसा रडलो. देवालापण खूप दोष दिला. मलाच असं बाळ का दिलं? मी काय पाप केलं होतं? आता पुढे माझ्या बाळाचं कसं होणार? लोक काय म्हणतील? असे एक ना अनेक विचार मनात येत होते. असं सगळं झाल्यावर श्रीराजच्या बाबांनी मला सावरलं व समजून सांगितलं व त्यानंतर मी मनाशी ठरवलं काही झालं तरी मी माझ्या मुलाला ऐकायला व बोलायला लावणार.

श्रीराजला तपासणीसाठी पुण्याला आणावे लागायचे. आमचा हा प्रवास जवळपास दोन ते तीन तासांचा असायचा, त्यासाठी लागणारा डबा, खाऊ मी सकाळी लवकर उठून बनवायची व श्रीराजचे बाबा सातत्याने सेकंड शिफ्टला कामाला जायचे. पुण्यावरून तपासणी करुन आल्यानंतर ते मला अर्ध्या रस्त्यात सोडायचे व मी श्रीराजला घेवून संध्याकाळी ८ वाजता घरी पोहचायची.

श्रीराजची खेड येथे दररोज थेरपी चालू झाली व त्याला रोज रोज कोण घेवून जाणार व आणणार म्हणून मी माझी वकिलीची प्रॅक्टिस बंद केली व श्रीराजला रोज थेरपीला घेवून जावू लागले.

श्रीराजला आम्ही रोज थेरपीला नेत होतो पण बी.टी.ई.च्या मशीवर तो फारसे काही ऐकत नव्हता. म्हणून आम्ही श्रीराजचे इम्प्लांट करायचे ठरवले. त्यासाठी आम्ही अमित पाटील सरांच्या मार्गदर्शनाखाली कागदपत्रे गोळा करण्यास सुरुवात केली. सर्व कागदपत्रे गोळा केली. पण जेव्हा औंध येथे सरकारी रुग्णालयात बेरा तपासणी करण्यासाठी गेलो तेव्हा त्या तपासणीसाठी आम्ही चार ते पाच वेळा फेऱ्या मारल्या. त्यात ती तपासणी झोपेत होते. मग श्रीराजला रात्रभर जागा ठेवून सकाळी दोन तासांचा प्रवास, मध्ये मध्ये थांबून त्याला जागा ठेवण्यासाठी तो प्रवास साडेतीन तासात पूर्ण केला. श्रीराजची शेवटी बेरा तपासणी पूर्ण झाली. तेथिल एका डॉक्टरांनी मला विचारले

आता त्याचे वय किती आहे? मी सांगितले अडीच वर्ष त्यावर त्या डायरेक्ट बोलल्या आता ऑपरेशन (इम्प्लांट) करुन काहीच उपयोग नाही दोन वर्षांच्या आतचेच इम्प्लांट फायदेशीर असते. तुम्हाला त्याचा काहीच उपयोग होणार नाही. येथे पुन्हा एकदा आम्ही दोघेही गळून गेलो. घरी आल्यावर डोक्यात नुसते डॉक्टरांचेच विचार घोळू लागले. नंतर आम्ही अमित सरांकडे गेलो. तेव्हा सरांनी आम्हाला नीट समजावले व तीन–चार वर्षांच्या मुलांचे व्हिडीओ दाखविले. ज्यांचे पाच–सहा महिन्यापूर्वी ऑपरेशन झालेले होते. तेव्हा आमच्या जीवात जीव आला.

श्रीराजच्या इम्प्लांटसाठी आम्ही मार्च मध्ये फॉर्म भरला परंतु पाच–सहा महिने झाले तरी काहीच उत्तर येईना शेवटी आम्ही अमित सरांना विचारले असता सरांनी आम्हाला सांगितले की इम्प्लांटची स्किम सरकारने होल्ड केली आहे, ती केव्हा चालू होईल सांगता येणार नाही. तुम्ही काही पैसे भरा. आम्ही काही डोनेशन गोळा करू असे सांगितले. आठ–पंधरा दिवसात पैसे भरायचे होते. श्रीराजचा प्रॉब्लेम कळण्याअगोदरच आमचा दोघांचाही ॲक्सिडेंट झाला होता. त्यातच आमचे सगळे पैसे खर्च झाले होते. आता कसे पैसे भरायचे हा प्रश्न आम्हाला पडला. नातेवाईकांकडून पैसे घेतले तर परत कसे आणि कधी करणार म्हणून सगळ्या उमेदवारांकडे जायचे ठरवले. पण त्यात एक रुपयाही मिळाला नाही, उलट आमचा वेळ वाया गेला. शेवटी मोबाईलवर व्हॉट्स ॲपवर त्याच्या ऑपरेशनसाठी मदत मागितली व दवाखान्यात पैसे भरले. पैसे भरुन पण इम्प्लांटची तारीख येईना. मग आम्ही सरांना फोन करून विचारले असता त्यांनी सांगितले सी.एम. फंडाचे पैसे अजून जमा झाले नाही. त्यासाठी श्रीराजचे बाबा व मामा मंत्रालयात गेले व दुसऱ्याच दिवशी पैसे जमा होऊन श्रीराजचे इंम्प्लांट झाले. आम्हां दोघांना असे वाटले की झाले आता ऑपरेशन.. आता तो ऐकेल व बोलेल पण तेथून पुढेच खरी आमची सत्व परिक्षा चालू झाली.

श्रीराजला गावावरुन पुण्याला शाळेत घेवून जाणे मला शक्य नव्हते. म्हणून मी व श्रीराजच्या बाबांनी उरवडे येथील पुसाळकर स्वरनाद माता–बालक निवासी केंद्र येथे जायचे ठरवले व आम्ही इंम्प्लांट झाल्यानंतर १५ दिवसातच उरवडे शाळेत गेलो. जाताना श्रीराजची मोठी बहिण ओवी हिला शिक्षणासाठी माझ्या आईकडे, ओवीच्या मामाकडे पाठविले. तेव्हा मात्र माझ्या जीवाचा खूप कालवा झाला. एका मुलासाठी मी माझ्या दुसऱ्या मुलीचा वनवास केला अशी भावना त्यावेळेस माझ्या मनात आली. पण त्यावेळेस स्वरनाद शाळेतील संस्थापिका रक्षा ताई व मुख्याध्यापिका कविता ताई यांनी मला खूप धीर दिला व मला खूप समजावले. तसेच श्रीराजचे बाबा देखील घर सोडून कंपनीजवळ राहायला गेले.

श्रीराजला घेवून मी जेव्हा उरवड्याला शाळेत निघाले तेव्हा गावातले सगळे

लोक बोलायचे वेडे झालेत दोघे नवरा–बायको. मुलगा–आई एकीकडे, मुलगी एकीकडे आणि बाबा एकीकडे. मुलाचं ऑपरेशन करुन अधू केलयं, त्याला मशीनने कोठे ऐकायला आणि बोलायला येत का? ह्याला नीट करण्यापेक्षा अजून एक मूल होवू द्यायचं ना, ह्यांनी जागरण–गोंधळ घातला नसेल नाही तर आईने ग्रहणात काहीतरी उद्योग केला असेल, असे एक ना अनेक बोलणी लोक बोलत होते. पण त्यांचं काहीएक न ऐकता मी माझ्या मुलाला घेवून उरवड्याला स्वरनाद शाळेत दाखल झाले.

उरवड्याच्या स्वरनाद शाळेत आल्यानंतर माझ्या श्रीराजला कसं घडवायचं आणि कसं बोलतं करायचं याचे योग्य मार्गदर्शन मला येथिल ताईंनी आणि माझ्या मैत्रिणींनी मला केलं. तरीसुद्धा शाळेत येवून मला दोन महिने पूर्ण झाले होते. पण श्रीराज आवाज घेत नव्हता. मला रात्र रात्र झोप येत नसे. तेव्हा मला तेथिल ताईंनी सांगितले तो आवाज घेतोय. एक दिवस तो नक्की बोलेल तुम्ही फक्त सातत्याने त्याच्याशी बोलत जा. त्यानंतर मात्र मला माझ्या ध्येयाचा योग्य रस्ता मिळाला व मी श्रीराजशी सातत्याने बोलू लागले व श्रीराज पंधरा दिवसात पहिला शब्द बाबा बोलला व माझ्या आनंदाला पारावार उरला नाही. श्रीराज छान बोलायचा प्रयत्न करु लागला व काही शब्दही सहा महिन्यात बोलू लागला.

सगळं व्यवस्थित चालू होतं, पण मुलीचा सातत्याने फोन येवू लागला. आई मला करमत नाही गं... तुझी आठवण येते. मला नाही इथं राहायचं... असं श्रीराजची बहिण बोलू लागली. त्यातच आई आजारी पडली. मग मला उरवडे शाळेतून नाईलाजाने बाहेर पडावं लागलं. नंतर मी कोथरूड येथे ॲडमिशन घेवून रोज येवून जावून शाळेत जाण्याचा निर्णय घेतला. मी रोज सकाळी साडेसात वाजता घर सोडून संध्याकाळी साडेसहा वाजता घरी जाते व आठवड्याच्या शनिवार–रविवारी माझ्या मुलीला भेटायला जाते.

पण एवढं सगळं असून देखिल माझ्या मुलाला मी कर्णबधिर या लेबल मधून बाहेर काढणार व माझ्या मुलाला बोलते करणार यासाठी मला स्वरनाद या शाळेचे जे योगदान लाभले त्याचे वर्णन मी शब्दात नाही करू शकणार.

ज्ञानदेव रचिला पाया,

तुका झालासे कळस...

या पंक्तींप्रमाणे स्वरदान शाळेचा पाया जरी डॉ. वाचासुंदर यांनी रचला असेल तरी त्याचा कळस बांधण्याचं काम रक्षाताई, शाळेतील सर्व शिक्षिका व स्वरनादच्या इतर सर्व कर्मचाऱ्यांनी केलेला आहे.

◆◆◆

## स्थलांतरीत पाखरं

**ज्योती दरणे**
मेट्रन, पुसाळकर स्वरनाद

स्वरनाद – उरवडे हे नाव परिचीत होतं. फोंडा – गोवा येथील शाखेशी परिचय होता. पण उरवडे – घोटावडे हे नाव कधीही ऐकलेलं नव्हतं. माझं भाग्य थोर म्हणून स्वरनादशी जोडले गेले. कर्णबधिर (खरं तर मला अशाप्रकारे उल्लेख करायला अजिबात आवडत नाही.) मूल व माता यांचे पुनर्वसन केंद्र, हे तर कल्पनेपलिकडील होतं. फक्त हातवारे करुन ही मुलं–माणसं संवाद साधतात, एव्हढंच तोकडं ज्ञान होतं. अगदी वयाच्या ६७ वर्षीसुद्धा पण प्रत्यक्ष अनुभव घेण्याची ही सुसंधी मला नशिबाने मिळाली आणि येथे २४ तास (निवासी) राहून माता–बालक यांच्या शिक्षिका यांचे परिश्रम रोज बघतेय.

इथून जी बालके शिक्षित होतात, ऐकू लागतात, बोलू लागतात आणि पुढच्या वाटचालीसाठी आत्मविश्वासाने बाहेर पडतात सामान्य शाळेत जाण्यासाठी.

प्रथम माता–पिता ह्या लेकरांना घेऊन येथे प्रवेशासाठी येतात, ते साशंक मनाने खरंच आपलं लेकरु ऐकू शकेल? बोलू लागेल? एका मातेने महिनाभर वाट पाहिली, तिचं बाळ तिला आई म्हणून खरंच हाक मारेल का? ती हमसून–हमसून रडत मला विचारत होती. तिला धीर दिला. अगं... पी हळद आणि हो गोरी असं नसतं गं... थोडी थांब, अशी वेळ येईल. शिवराज अस्सा बोलू लागेल की बाबारे आता पुरे... थांब बोलायचा आणि खरंच आमचा शिवराज अस्सा बोलतोय की ऐकतच रहावे. येथून प्रशिक्षित होऊन गेलेली मुले सामान्य शाळेत जाऊन व्यवस्थित शिक्षण घेत आहेत. खरंतर त्यांच्या पालकांचं, घरातील लोकांचं श्रेय ह्यात लाखमोलाचं आहे. काही दुसरी छोटी मुलं, आजी, मावशी इ. नातेवाईक यांच्यावर सोपवून, अक्षरशः जड अंतःकरणाने ह्या माता ह्या मुलांसाठी, संसार–घरदार सर्व काही काळापुरतं का होईंना, पण येथे येतात. मुलांबरोबर त्यांच्या वर्गात बसून, शिकून घेतात की पुढे जाऊन ह्यांच्याशी हातवारे न करता, कसं त्यांना समजून घेऊन समजवायचं पण, खरी करामत, जिद्द, चिकाटी, संयम साधून ह्या मुलांचे मूड सांभाळून त्यांना सर्वांगीण शिक्षण द्यायचं. नवीन आलेलं मूल बावरलेलं असतं, सर्वच परिस्थितीशी जुळवून घ्यायला त्याला कठीण जातं. बोलता येत नाही, निषेध नाराजी तर दाखवायचीच आहे. मग एक एक ठेवणीतील शस्त्रे बाहेर येऊ लागतात. रडणं, आरडा–ओरडा, वस्तूंची फेकाफेकी, जेवणावर राग, दूध प्यायच नसतं, डायनींग टेबलजवळ तर नाहीच फिरकायचं. मग घरच्याप्रमाणे माता त्याच्या हाती मोबाईल, चॉकलेट, चिप्स देऊन त्यांना मनवणार. हे त्यांच्या अंगवळणी पडू नये म्हणून आम्हांला थोडी कठोर पावलं उचलावी लागली. डायनींग हॉलमध्ये येताना मोबाईलला नो एंट्री, अर्थात हे बंधन अंमलात आणायला आम्हालाही संयम ठेवावा लागला. पण आता समाधानाने, आनंदाने सांगाव वाटतंय, की आम्ही ह्यात यशस्वी झालो. घरच्या सवयी, जेवणाचा स्वाद, वेळा हे त्यांच्या पचनी पडायला सर्वांचीच मेहनत कामी आली.

त्यांच्या मुख्याध्यापिका कविताताई, सर्व शिक्षिका मुलांबरोबर जेवतात, गोड बोलून प्रत्येक भाजी, सॅलॅड खाणे व कोणीही न भरवता, स्वतःच्या हाताने समाधानाने जेवणे, हे सर्वांनी अथक प्रयत्न करून साध्य केले आहे.

आमची एक बाहुली माही तिसऱ्या वर्षी आमच्याकडे आली. एकत्र कुटुंब असल्याने, सगळ्यांनीच ती म्हणेल तसे तिचे लाड पुरवले. चार महिने तिने तिचा हट्टीपणा दाखवून सर्वांना सळो की पळो करुन सोडले. आईला क्षणभरसुद्धा नजरेआड होऊ द्यायची नाही. चार चार जणींना ती आवरत नव्हती. शरीर ताठ करुन सगळ्यांना पुरुन उरायची. जेवायचं नाही, फक्त रडणं. हळू हळू ती रुळली. आता आम्हालाही प्रश्न पडतो, हीच का ती रडूबाई माही? अगदी १० टक्के मुलंच दोन दिवसात ॲडजेस्ट होतात. बाकीच्यांना प्रवाहात आणताना सर्वांचीच दमछाक होते. आमच्या माता-भगिनी एकमेकींना छान सांभाळून घेतात, मुलांची आई काही कारणास्तव बाहेर गेली तर मुलांची पूर्ण जबाबदारी घेतात. आत्ताच एक अडीच वर्षांचा रुद्र त्याच्या आजीबरोबर आलाय. तेव्हां खूप रडत होता. आईपण कर्णबधिर आहे. आईच्या आठवणीने रडत असावा. पण धन्य त्या आजीची (आईची आई) प्रचंड संयम राखून शांतपणे त्याला सांभाळते. आत्ता पाऊण महिन्यात तो नजरेला नजर भिडवतोय. आज्जीला सोडून एका जागी शांत बसतोय, मला खात्री आहे, तो पण सुधारुनच इथून बाहेर पडेल.

ह्या सर्व बालकांची आज्जी होण्याचं भाग्य मला लाभलंय. दिवस उजाडतो कधी आणि मावळतो कधी हेच समजत नाही. अडचणीही येतात. पण आमच्या प्रिंन्सिपल, डायरेक्टर रक्षा मॅडम, डॉ. अविनाश वाचासुंदर इ. सर्वांच्याच मदतीने आम्ही पुढची वाटचाल करतोय. हे कार्य समर्थपणे स्वरनादचे सदस्य पार पाडताहेत.

मुलांना रंग-स्वाद, स्पर्श, चवी, नाती ई. गोष्टींची जाणीव करुन देण्यासाठी वेगवेगळे उपक्रम राबवले जातात. प्रत्येक सण साजरे करताना, त्याचे महत्त्व दाखवून देण्याकरता, लेसन घेऊन प्रात्यक्षिक दाखवतात. आधी मंडई दाखवून, नंतर आमच्या आवारातच त्यांच्याकडून मंडई भरवून घेतात. जेणे करुन पैशांची देवाण-घेवाण ह्याचे त्यांना ज्ञान व्हावे. एखादी शिक्षिका गैरहजर असल्यास लगेचच विचारणा होते. इतकी ही मुलं इकडे समरस होतात. जुळवून घेतात. भांडतात-मस्ती करतात, परत हातात हात, गळ्यात गळे घालून बागडायला लागतात. शिस्त अंगात भिनली आहे हे त्यांच्या हात धुवून जेवायला बसणे, जेवणाआधी हात जोडून प्रार्थना म्हणणे इ. मधून दिसून येते.

खूप काही सांगायचं आहे, पण मर्यादा आहेच ना. आमच्या पहिल्या बॅचच्या तीन मातांनी टीचर ट्रेनिंग यशस्वी पार पाडलंय. आत्ताच्या पल्लवी व मयूरी आणि स्वरनादची माजी विद्यार्थिनी श्रद्धा ह्या तिघीही उत्तम गुणांनी उत्तीर्ण होऊन, आमच्याच शाळेत रुजू झाल्या आहेत. पुढे जाऊन त्यांच्या शिक्षणाचा इतर मुलांना फायदा व्हावा, त्यांना योग्य ते मार्गदर्शन व्हावे हा स्वरनादचा हेतू सफल होवो...

धन्यवाद..!

◆◆◆

# होय! प्रत्येक कर्णबधिर मूल बोलेल..

**कॉक्लिआ पुणे फॉर हिअरिंग अ‍ॅण्ड स्पीच**

**स्वरनाद कर्णबधिर बालकांचे पुनर्वसन केंद्र**

## निवासी केंद्राची वैशिष्ट्ये

**प्रवेश चालू २०२५-२६**

१. २५ कर्णबधिर मुले आणि त्यांची माता यांची निवास व्यवस्था
२. दृश्य आणि क्रियाकलाब आधारित
३. शिक्षणावर विशेष भर देऊन पूर्व प्राथमिक शिक्षण
४. जवळपासच्या गावातील कर्णबधिर मुलांसाठी बालवाडी
५. भोजन व्यवस्था दालन – ५० जणांसाठी
६. लवकर निदान आणि हस्तक्षेप
७. बालक पालक कार्यक्रम
८. वाचा भाषा प्रशिक्षण (० ते ६) वयोगटातील मुले
९. नियमित वाचा भाषा विकास मूल्यांकन श्रवण तज्ज्ञांकडून श्रवण चाचणी
१०. पालक प्रशिक्षण कर्णबधिर मुलांना मार्गदर्शन करण्यासाठी त्यांच्या मातांना सक्षम करणे.
११. विशेष शिक्षकांचे प्रशिक्षण

: संपर्कासाठी :

**9923289844 / 9822094940**

**HTTPS://COCHLEASWARANAAD.ORG/**

**पुसाळकर स्वरनाद माता बालक निवासी पुनर्वसन केंद्र**
**उरवडे, तालुका मुळशी, जि. पुणे.**

## SWARANAAD REHABILITATION CENTER
## Monthly Achievement - NOVEMBER 2025

| Sr. No. | FACILITIES | SESSION / STUDENT COUNT |
|---|---|---|
| 1. | Speech Therapy Sessions | 248 |
| 2. | No. of Student getting Speech Therapy | 55 |
| 3. | Aided Audiogram Testing | 1 |
| 4. | No. of Speech Assessment | 0 |
| 5. | No. of Counseling Sessions | 8 |
| 6. | Individual Occupation Therapy Sessions | 83 |
| 7. | Group Occupational Therapy Sessions | 2 |
| 8. | Psychological Assessment | 3 |
| 9. | No. of Students getting Individual OT | 56 |
| 10. | No. of Activity Therapy Session | 2 |

## SWARANAAD OUTREACH CENTER
## Monthly Achievement - NOVEMBER 2025

| Sr. No. | CENTERS | THERAPY SESSION |
|---|---|---|
| 1. | Khed | – |
| 2. | Narayangoan | 42 |
| 3. | YCM Pimpari | 77 |
| 4. | Morya Chinchwad | 43 |
| 5. | Phonda | 80 |
| 6. | Porvorim | 73 |
| 7. | Manchar | 82 |
| 8. | Daund | 6 |
| 9. | Urawade (Residential) | 65 |
| 10. | Kudal | 52 |

## संस्थेची केंद्र

**'स्वरनाद' कर्णबधिर बालकांचे बहुआयामी अपंग पुनर्वसन केंद्र**
बिंदू माधव ठाकरे दवाखाना,
गोसावी वस्ती समोर, हॅप्पी कॉलनी रोड,
कोथरूड, पुणे - ४११ ०३८.
**संपर्क : रक्षा देशपांडे ९९२३२८९८४४**
**मृदुला देवळाणकर ८५५०९१२९७७**

**वाचा भाषा प्रशिक्षण केंद्र, चिंचवड**
मोरया मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल,
पिंपरी-चिंचवड लिंक रोड, पी.एम.टी.
शेवटच्या बसस्टॉप समोर, चिंचवडगाव,
पुणे - ४११ ०३३. **फोन : ९८२२६७१८४०**

**वाचा भाषा प्रशिक्षण केंद्र, खेड**
डॉ. खडके गेस्ट हाऊस,
राजगुरुनगर बाजारपेठ, ता. खेड, पुणे.
**फोन : ९८५०७३८२७६**

**वाचा भाषा प्रशिक्षण केंद्र, नारायणगाव**
सावळेराम मार्केट, नारायणगाव,
डॉ.वाचासुंदर कान-नाक-घसा क्लिनिक, पुणे.
फोन : ९७६६२६२३२७; ७७९८४३४९८९

**'स्वरनाद' कर्णबधिर बालकांची पूर्व प्राथमिक शाळा, पर्वरी-गोवा**
अनघा, प्लॉट नंबर १५, पी.डी.ए. कॉलनी,
पर्वरी बार्देश, गोवा - ४०३ ५२१.
**फोन : ९६२३७०१०२०**

**श्री शारदा ग्रंथ प्रसारक संस्था, सांचालित स्वरनाद कर्णबधिर मुलांसाठी पूर्व-प्राथमिक विद्यालय**
एफ-४, पहिला मजला, पै हाऊस सदन,
फौंडा, गोवा - ४०२ ४०१.
**फोन : ९६२३७०१०२०**

**वाचा भाषा प्रशिक्षण केंद्र, पिंपरी**
वाय.सी.एम. हॉस्पिटल,
(पिंपरी-चिंचवड पालिकेच्या संयुक्त विद्यमाने) पिंपरी.
**फोन : ८०८७२२९९५४**

**वाचा भाषा प्रशिक्षण केंद्र, दौंड**
शालीमार चौक, आनंद अपार्टमेंट,
'सी' विंग, फ्लॅट नं.२,
फॉरेस्ट ऑफिस समोर, ता. दौंड, पुणे.
**फोन : ७०४०६६८०७१/८६६८८३१२११**

**वाचा भाषा प्रशिक्षण केंद्र, मंचर**
डॉ. तोडकर हॉस्पिटल, पिंपळगाव फाटा,
मंचर, ता. आंबेगाव, जि. पुणे.
**फोन : ८४५९०१९६०२**

**वाचा भाषा प्रशिक्षण केंद्र, कुडाळ**
लायन्स सेवा संकुल कुडाळ, अभिनवनगर,
ता. कुडाळ, जि. सिंधुदुर्ग.
**फोन : ९४०५९९८९८९**

**'पुसाळकर स्वरनाद' माता बालक निवासी पुनर्वसन केंद्र**
माँटवर्ट विस्टा समोर, सर्वे नं. ४२५,
उरवडे, पिरंगुट, ता. मुळशी,
पुणे - ४१२ ११५.
**फोन : ८३०८८३२१४५**



पिंपरी-चिंचवड केंद्राचे धनगर नृत्य

खेड, मंचर आणि नारायणगाव केंद्राचे शेतकरी नृत्य



उत्कृष्ट शिक्षिका पारितोषीक



RNI No. : MAHBIL/2013/59067
SDM/PUNE/SR/21/2015
Registration No. : PCW/195/2023-25

Published and Posted on 10th DECEMBER, 2025
Posted at Model Colony PSO, Pune 411 016
on 10 of each month.

## वार्षिक कॉक्लिआ वार्ताचे प्रकाशन



**Address :**
**To,**